# श्री साईबाबांच्या पादुकांची स्थापना

## श्री. दस्तुर यांच्या घरचा समारंभ



गिरगाव खेतवाडी चौदाव्या गल्लीतील श्रीसाईभक्त श्री. के. एम. (कैकस्त्रू माणेकर्जी) दस्तूर यांच्या निवासस्थानी ता. ७ फेब्रुवारी १९७६ रोजी श्रीसाईबाबांच्या पादुकांची प्रतिष्ठापना छायाचित्रकार श्री. भोलानाथ समेळ यांच्या शुभहस्ते समारंभपूर्वक करण्यात आली. याप्रसंगी श्री. काकासाहेब अवस्थी, डॉ. गव्हाणकर, श्री. डी. पी. कोरगावकर, श्री. सामंत इ. मुंबापुरीतील नामवंत श्रीसाईभक्त मंडळी हजर होती. सायंकाळी श्री. समेळ व श्री. श्रीराम सातर्डेकर यांच्या श्रीसाईगीतांचा कार्यक्रमही येथे चांगलाच रंगला.

●

## किर्तनकारांना आवाहन

● ज्या साईभक्तांना येत्या रामनवमीच्या दिवशी दादर येथील 'श्रीसाई-निकेतन' या आमच्या मुंबईतील कचेरीत सुश्राव्य किर्तन करावयाचे असेल त्यांनी आपले नाव व पत्ता **त्वरीत** मुंबई कचेरीकडे पाठवावा ही विनंती. किर्तनाची वेळ सकाळी ८–३० ते ११–३० पर्यन्त राहील. योग्य किर्तनकाराची अवश्य दखल घेतली जाईल.

साईभक्त किर्तनकार

# कै. बापूराव रामचंद्र काकडे

● सदानंद चेंदवणकर

दहिसरचे श्री. काकडे महाराज यांच्या नावापूर्वी 'कै.' हे अक्षर लिहिण्यास अतीव दुःख होत आहे. गतसाली आमच्या दादर येथील 'श्रीसाई निकेतन' मध्ये रामनवमीस काकडे गुरुजींचे सुश्राव्य किर्तन झाले होते व त्याप्रसंगी श्रोते अक्षरशः मंत्रमुग्ध झाले होते. गतवर्षी प्रमाणेच यंदाही रामनवमीस त्यांचा किर्तन कार्यक्रम आयोजित केला होता. श्री. काकडे महाराजांच्या प्रेमळ आग्रहामुळे आम्ही ता. २६ जानेवारीस मुद्दाम दहिसरला जाऊन त्यांची भेट घेतली होती. त्यांच्या 'स्पिरीच्युअल सेंटर' (आध्यात्मिक केंद्र) ची पहाणी केली होती. याप्रसंगी अत्याग्रह करून त्यांनी आम्हास प्रसाद भोजन खाऊ घातले होते याचे स्मरण आम्हांस आहे. प्रत्यक्ष भेटीत ते आमच्याशी खूप खूप बोलले. श्रीसाईलीलेच्या लेखक-कवी संमेलनास शिर्डी येथे येण्याची इच्छाही त्यांनी प्रगट केली होती. इतकेच नव्हे तर महिन्यातून एका गुरुवारी दादर येथील आमच्या कार्यालयात साईभक्तांनी एकत्र येऊन एखादया कार्यक्रमाची योजना आखावी व ती तडीस न्यावी अशी इच्छाही त्यांनी प्रदर्शित केली होती. काकडे महाराजांच्या एकंदर बोलण्यावरून ते इतक्या लौकर आमच्यातून निघून जातील असे मुळीसुद्धा वाटले नव्हते. त्यांची प्रकृति अगदी ठणठणीत होती. पण साईभक्तीत रस घेणारे व श्रीसाई लेखनात रममाण होणारे काकडे महाराज अचानकपणे रवि. ता. २२ फेब्रुवारी रोजी श्रीसाईचरणी विलीन झाले हे कळताच धक्काच बसला.

श्री. बापूराव रामचंद्र काकडे हे मूळचे बडोद्याचे. त्यांचा जन्म ११ ऑगस्ट १९११ रोजी बडोदा येथे झाला. त्यांचे प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षण बडोदयालाच झाले. त्यांचे वडील श्री. रामचंद्रपंत हे बडोदा संस्थानात नोकरीस होते. लहानपणापासूनच बापूरावांना अध्यात्माची आवड. शिक्षण आटोपताच त्यावेळच्या संस्थानी काळात त्यांनी सरकारी नोकरी पत्करली. तेथल्या महसूल खात्यात ते १९५० पर्यन्त नोकरीस होते. पुढे १९५१ ते ५३ पर्यन्त ठाणा कलेक्टर कचेरीत व १९५४ पासून बोरीवलीच्या मामलेदार कचेरीत अव्वल कारकून म्हणून त्यांनी इमाने इतबारे नोकरी केली. १९६६ पासून ते मुंबईच्या रेशनिंग कचेरीत कामाला होते १९६९ साली ते सेवानिवृत्त झाले. आपल्या

अध्यात्म्याच्या केवळ आवडीखातर त्यांनी १९५५ साली आपल्या रहात्या निवासस्थानीच अध्यात्मिक केंद्र उघडून त्यास 'श्रीसाई स्पिरीच्युल सेंटर' असे नाव दिले. दर गुरुवारी येथे सायंकाळपासून तो रात्री साडे दहा वाजेतोपर्यन्त काही ना काही अध्यात्मिक कार्यक्रम चाललेला असे. दहीसर परिसरातील श्रीसाईप्रेमी जनता त्यांच्या कार्यक्रमास हजर राही. अनेकव्याधी ग्रस्तांना काकडे महाराजांनी आपल्या अद्भूत अध्यात्मिक शक्तिसामर्थ्याने रोगमुक्त केल्याचे दाखले आहेत. श्री. काकडेगुरुजी यांचा विवाह १९३० साली झाला. त्यांच्या प्रेमळ, सुशील व आतिथ्यशील पत्नी जानकीबाई यांचेवर दुःखाचा डोंगरच जणू कोसळला आहे. श्री. बापूराव यांचे मागे त्यांच्या दोन विवाहित कन्या, दोन अविवाहित कन्यका व एक पुत्र श्री. शरदचंद्र हे आहेत. मुले आणि नातवंडे यांनी गजबजलेल्या घरातून श्री. काकडे महाराज एकाएकी निघून गेल्याने या साऱ्याच मंडळींना अपार दुःख होणे सहाजिकच आहे. स्वभावाने काकडे गुरुजी मोठे प्रेमळ. लेखन व वाचनाकडे त्यांचा विशेष ओढा होता. त्यांच्या कौटुंबिक दुःखात आम्ही सहभागी आहोत.

(श्री. काकडे गुरुजींचा श्रीसाईलीलेकडे यापूर्वी आलेला एक लेख 'मृत्यु आणि बाबा' हा याच अंकात इतरत्र प्रसिद्ध केला आहे.)

●

---

## श्रीसाईलीला नववर्षारंभ अंकात

- मरहूम खाँसाहेब अब्दुल करीम खाँ व श्रीसाईबाबा –रंजक माहितीपूर्ण लेख.
- श्रीसाईभक्तांची श्रद्धास्थाने या सदरात कुर्ल्याचे श्री साईमंदिर.
- वर्णीची देवता प्रसन्न असलेले आजचे महान् साईभक्त –श्री गजानन महाराज पट्टेकर यांचा आगळा परिचय.
- तुमचे श्रीबाबांच्या विषयीचे सामान्य ज्ञान किती आहे ? नवे रंजक माहितीपूर्ण सदर.
- बाबांच्या अगम्य लीला–युगावतार श्रीसाईबाबा या ग्रंथाच्या आधारे अनुवादित नवी लेखमाला.
- हे सारं बाबांच्यासाठीच हं ! – नवी परिचयमाला.

# शिर्डी वृत्त–जानेवारी १९७६

या महिन्यात साईभक्तांची गर्दी मोठ्या प्रमाणात होती.

प्रजासत्ताक दिन २६ जानेवारीचे सुट्टीला जोडून सुटटी आल्यामुळे तीन दिवस मोठ्या यात्रेचे स्वरूप आले होते. संस्थानच्या परिसरात स्पेशल --बसेस व कारच्या रांगांनी सगळे रस्ते व्यापले होते. अनेक भक्त जागेच्या अभावी दर्शन घेऊन तावडतोब परत गेले कोपरगाव-राहता येथील हॉटेल्समधील जागासुद्धा पूर्ण भरल्या होत्या.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :–

कीर्तन :– (१) काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशीशास्त्री, संस्थान गवई यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली. (२) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे यांचे कीर्तन. शिर्डी. (३) ह. भ. प. तुकारामबुवा परदेशी शिर्डी यांचे कीर्तन.

प्रवचन :– (१) ह. भ. प. जगन्नाथबुवा वाघचौरे शिर्डी. (२) स्वामी चेतननील जम्मु. काश्मीर.

भजन, गायन वादन :– (१) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई. (२) श्रीराम विष्णू सातर्डेकर, मुंबई. (३) श्रीसाईसेवा भजन मंडळी, खार, मुंबई. (४) श्री. पुरुषोत्तमलाल दुर्गादास, नासिक रोड. (५) श्री. गुरुदत्त शुक्ल, मुंबई १४. (६) सौ. सीतालक्ष्मी सुंदरेशन पुणे ११. (७) श्री. पंढरीनाथ कोल्हापूर मुंबई. (८) श्री. राम मा. शिंदे, पुणे ९. (९) कु. पद्मजा कोटस्थाने, शिर्डी. (१०) श्री. राजाराम देसाई, मुंबई १८. (११) श्री. दत्ता ठकार मुंबई १८. (१२) श्री. रघुनाथ शेट, मुंबई १८. (१३) सदानंद के. सामंत, कोल्हापूर. (१४) श्री. सुधाकर ना. कामतेकर, मुंबई ३१. (१५) श्री. विठ्ठरराव ह. उल्हे, अमरावती. (१६) श्री. गोपीनाथ ना. वाळके, मुंबई १६. (१७) रजनीगंधा (ऑर्केस्ट्रा) अहमदनगर श्री. रमेश रोकडे डायरेक्टर व पार्टी. (१८) ह. भ. प. विजयबाबा घंतोली, नागपूर. (१९) श्री. जयंतराव कोंडा, नागपूर. (२०) श्री. नरहर त्र्यं. व्यास, तळेगाव. (२१) श्री. गंगाधर नरहर बुवा, तळेगाव. (२२) श्री. रमणासाई समाज. आंध्रप्रदेश. (२३) श्री. सत्यसाई समिती, उल्हासनगर. (२४) श्री. गुणानाथ पां. खानोलकर, मुंबई १२.

प्रजासत्ताकदिन :– २६ जानेवारी प्रजासत्ताक दिना निमित्त मा. श्री. का. सी. पाठक कोर्टरिसिव्हर यांचे शुभहस्ते श्रीसाई मंदिरावरील कळसाजवळ

ध्वजवंदन कार्यक्रम झाला. संस्थान कर्मचारी, सन्मानिय पाहुणे होमगार्ड पथक भक्त, ग्रामस्थ श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालयातील आणि प्राथमिक शाळांतील शिक्षकवर्ग, विद्यार्थी-विद्यार्थीनीं बॅण्ड पथकासह उपस्थित राहिल्याने कार्यक्रम थाटात साजरा झाला. नेहमीप्रमाणे संस्थान तर्फे मुलांना खाऊ वाटण्यात आला.

हवापाणी :— शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटेच्या वेळेस हवेत गारवा असतो.

माननीयांच्या भेटी :—

(१) मा. श्री. बी. पी. दलाल, आय. सी. एस. सेवानिवृत्त, मुंबई.
(२) मा. श्री. के. पद्मनाभैया, आय. ए. एस. जिल्हाधिकारी नासिक
(३) मा. श्री. व्ही. सुंदरम् आय. ए. एस. जिल्हाधिकारी अहमदनगर
(४) मा. श्री. बट आय. एफ. एस. चिफ कॉन्झरव्हेशन ऑफिसर महाराष्ट्र राज्य.
(५) मा. श्री. बी. जे. खताळ, राज्यमंत्री महसूल व नियोजन महाराष्ट्र राज्य.
(६) मा. श्री. टी. के. टोपे कुलगुरु मुंबई विद्यापीठ, मुंबई.
(७) मा. श्री. ए. पी. गिब्स्, जिल्हाधिकारी, धुळे
(८) मा. श्री. निंबाळकर, आय. ए. एस. डायरेक्टर ऑफ शुगर महाराष्ट्र, पुणे.
(९) मा. श्री. एस. जंबुनाथन, व्हाईस चेअरमन व जनरल मॅनेजर, महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट, मुंबई.
(१०) मा. श्री. रामनाथ वाघ अध्यक्ष जिल्हा परिषद अहमदनगर.
(११) मा. श्री. विलासराव पाटील, प्रांताधिकारी, संगमनेर.

# शिरडी वृत्त-माहे फेब्रुवारी १९७६

या महिन्यात साई दर्शनासाठी बाहेरगावच्या भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती पुढीलप्रमाणे :—

कीर्तन :— (१) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली. (२) केशव कुलकर्णी. पुणे.

प्रवचन :– (१) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिर्डी. (२) श्री. कैकाडी महाराज पुणे.

भजन :– (१) वज्रेश्वरी भजनी मंडळ, कोपरगाव. (२) हनुमान प्रासादिक भजन मंडळी, इगतपुरी. (३) कु. मीराबाई भजन मंडळी, विजयवाडा (४) सौ. वत्सलाबाई का. पवार, श्रीरामपूर. (५) ह. भ. प. बशीरबाबा भजन मंडळी, आंध्रप्रदेश.

गायन, वादन, नकला – (१) श्री. आर. एम. देवचक्के. अ. नगर. (२) श्री. आनंदराव के. आढाव, कोपरगाव. (३) कु. निर्मला खंडेराव कुलकर्णी, कोपरगाव. (४) कु. मंगला सु. वहाडणे, कोपरगाव. (५) श्री. दिलीप ज पांडे, कोपरगांव. (६) श्री. दत्तोबा गुरव शिर्डी. (७) श्री. अप्पा सामंत, मुंबई. (८) विरसेन गव्हाणकर, मुंबई. (९) श्री. रघुनाथ सांडभोर, व सौ. सांडभोर, पुणे. (११). श्री. सातर्डेकर, मुंबई. (१२) श्री. भालचंद्र गव्हाणकर, मुंबई. (१३) श्री. वसंतराव देशपांडे, पुणे. (१४) श्री. जगदीश ना. वैष्णव, पुणे.

महाशिवरात्री कार्यक्रम :– महाशिवरात्रीच्या दिवशी श्रींच्या दर्शनासाठी भक्तांची फार गर्दी झाली होती. रात्री कीर्तनाचा कार्यक्रम झाल्यावर श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून फिरून आली त्यानंतर शेजारती झाली.

सन्माननीयांच्या भेटी :–

१) मा. श्री. रमाकांत कदम, जॉइंट चारिटी कमिशनर, मुंबई.

२) मा. श्री. टी. ए. पै, उद्योग व पुरवठा मंत्री भारत सरकार, दिल्ली.

३) मा. श्री. एन. एम. तिडके, उद्योगमंत्री महाराष्ट्र राज्य.

४) मा. श्री. उदयसिंगराव गायकवाड, राज्यमंत्री ग्रामविकास व उद्योग महाराष्ट्र राज्य.

५) मा. श्री. एम. आर. पाटील IAS जिल्हाधिकारी, धुळे.

६) मा. श्री. हरनाम शंकर, सदस्य इन्कमटॅक्स ट्रिब्यूनल महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७) मा. श्री. पी. नरसिंगराव चेअरमन स्टेट रोड ट्रान्सपोर्ट, आंध्रप्रदेश.

८) मा. श्री. डी. आर. खडके, कमिशनर सेंट्रल सी. आय. डी. डायरेक्टर स्पेशलब्यूरो.

हवापाणी :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

ग्रंथ भेट अभिप्राय

## आजच्या काळाची गरज

(लेखक– श्री. शंकरराव आप्पाजी पाटील चंदूरकर, प्रकाशक– श्री. शि. वा. संकनवाडे, अखिल भारत वीर शैव संघ शाखा कोल्हापूर, पृष्ठे ५६)

आजच्या काळाची गरज किंवा 'सत्यं शिवं सुंदरम' हे छोटेखानी पुस्तक कोल्हापूरचे सुप्रसिद्ध कार्यकर्ते श्री. शंकरराव पाटील यांनी लिहिलेले आहे. या पुस्तकात कोल्हापूर जिल्ह्यातल्या हातकणंगले तालुक्यातल्या चंदूर या लहानशा खेड्याचा इतिहास व त्याचा आजचा विकास कथन केलेला आहे. याचप्रमाणे तेथल्या वैशिष्ट्यांचा व देवस्थानांचा ही परिचय करून दिलेला आहे. याशिवाय या पुस्तकात नीतीबोधाच्या बत्तीस कथा आधुनिक गोष्टीरूप पद्धतीने सांगितलेल्या आहेत. त्या वाचताना पंतप्रधान इंदिरा गांधीजींच्या वीस कलमी योजनांची अनेकदा आठवण होते. या पुस्तकाला उपराष्ट्रपति श्री. बी. डी. जत्तींचा संदेश व श्रीमन्नरंजन जगद्गुरु श्री. दुरदुंडेश्वर निडसोसी मठाधिपती श्री. पूज्य निर्जलिंगेश्वर स्वामीजींचा शुभाशिर्वाद लाभलेला आहे.

—साईप्रसन्न

## आत्माराम भगवान उर्फ मामा मसुरेकर श्रीसाईचरणी विलीन



बेलासिस रोड येथील एक थोर साईभक्त श्री. आ. भ. मसुरेकर हे रवि. दि. ८–२–१९७६ रोजी सकाळी ७ वा. आकस्मिकरित्या साईनाथ वासी झाले.

ते श्री साईनाथ बाळगोपाळ मित्र मंडळाचे संस्थापक व अध्यक्ष होते. येत्या काही दिवसातच ते त्यांचे गुरु बाबामहाराज यांचे समवेत मसुरे येथील साईमंदिरातल्या साई पादुकांच्या प्रस्थापनेसाठी जाणार होते. मंदिर उभारणीच्या कार्यात त्यांचा पुढाकार होता. ते बेलासिस रोड व्यायाम शाळेचे उपाध्यक्ष व व्यवस्थापक होते.

बेलासिस रोड परिसरातील सारे रहिवासी त्यांना सत्पुरुष मानत होते श्री साईनाथ त्यांच्या आत्म्यास सद्गति देवो.

# सम्मेलन एक प्रेरणा

(१९७५ के पहिले लेखक-कवि सम्मेलन में अनुपस्थिति के कारण मन बडा खिन्न था । परन्तु साई सदा भक्तों की सहायता करते हैं । साई की ही प्रेरणा से २ रे लेखक-कवि सम्मेलन में भाग लेने का अवसर मुझे प्राप्त हुआ और मैं ठीक समय पर सम्मेलन में भाग ले सका – यह मेरा सौभाग्य था । दो दिन के सम्मेलन के आनंद का वर्णन करना मेरे सामर्थ्य के बाहर है । फिर भी विचार विनिमय के मंथन से जो नवनीत निकला, यही साई की सच्ची प्रेरणा व प्रसाद है । मुझे ऐसा लगता है कि

सम्मेलन तो साईका एक बहाना था ।
योग, ज्ञान और कर्म भक्ति को समझाना था ।।

साईबाबा की प्रेरणा से ही सम्मेलन का जो अनुभव मुझे आया है, उसको इस लघु रचना में मैंने अंकित किया है । आशा है कि पाठक तथा लेखक कवियों को भी इस प्रकार का अनुभव मिला होगा ।) ●

दो दिन बीते शिरडी में, लेखक कवि सम्मेलन में ।
भक्ति प्रवाह से उमड पडे प्रेमाश्रू नैनन में ।।१।।
धन्य धन्य वे भक्तगण सारे, धन्य धन्य यह जीवन ।
अनुभवों को सुन सुनकर सजल हो गये मेरे नयन ।।२।।
परिचयात्मक सम्मेलन बन गया 'साई परिवार' ।
भावावेश में भक्त सारे, गाते गौरव शत बार ।।३।।
आर्त पुकार को सुनकर ज्यों दौडे थे श्री भगवन ।
वैसे भक्तों की पुकार सुन, साई हरते पीडन ।।४।।
कितने प्यारे, कितने अनमोल साई के थे बोल ।
'नित्य हूँ मैं जीवित यहाँ पर' मन की आँखे खोल ।।५।।
साई लीला अनंत जग में, साईनाम पतवार ।
जो जैसे भजे मन में निसदिन, साई उतारे पार ।।६।।
पावन भूमि पावन शिरडी, असंख्य यात्री आते ।
भक्तिभाव से पूजा करके साई शरण में जाते ।।७।।
'साईलीला' गाये महिमा साई की बारबार ।
लेखक-कवियों की वाणी से झरे साई का प्यार ।।८।।

–राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'
पाटकर वाडा भगतसिंगपथ, डोंबवली (पूर्व)

## साई तुझ्या पादुका

साई तुझ्या पादुका –
    वंदिता वदेल पटपट मुका ॥धृ.॥
पवित्र चरणीं ज्या राहिल्या
नेत्रांनी ज्या कुणा दिसल्या
    तयाला स्वर्गही वाटेल फिका ॥१॥
अन्नजलाविन असेल व्याकुळ
ऐसा कुणी जो येईल काकुळ
    तहान हरपुनि तृप्तही होईल भुका ॥२॥
पूजन करिता पादुकांचे
भयही हरावे अति पाप्यांचे
    कुणि न करतील त्यांच्यावरि रे टीका ॥३॥
पादुका रक्षिता घरी देव्हारीं
बसवूनि भक्ता सुख-झोपाळीं
    तूंच तयाला स्वहस्ताने देशील रे झोका ॥४॥

–दत्ताराम आ. बारस्कर. १६ संतसेना महाराज मार्ग, खो. नं. ३४, मुंबई ४

## तूंची माझा साई ! हरी !

सर्वभार तुजवरती, तूंची माझा साई ! हरी !
जीवन नौकेसी या अपुनी पैलथडी नेई !!
        अपार तव शक्ती, भावभक्ति तव प्रिती ।
        भक्तवत्सल विठ्ठल तूं, पंढरी-शिर्डी क्षेत्री ॥
प्रवास खडतर हा, वाट काट्याकुट्यांची ।
कष्ट सुसह्य हे 'नामें' उतरीन घाट साची ॥
        भिती, क्रोध, चिंता रिपु मज छळति ।
        सौख्यामृतकलश तुझियाच हाती ॥
मना वाकुडे विचार, राक्षसच जणू !
नष्ट सत्वरी करी, हैराण हा अणूरेणू ॥
        नाही आणिक मागणे, होवो सुखाचा संसार ।
        अशुभ जळावे सारे, शुभ विहरावे सभोवार ॥

–श्रीधर सिद्धेश्वर प्रभुणे. १७८ यादो गोपाळ पेठ, सातारा

# तुझी उदी

तुझ्या उदीमध्ये
तुझेच अस्तित्व
तेणे तीत सत्व
अनुभवे ॥१॥

तुझ्या उदीमध्ये
परिसाचे कण
इच्छेचं ते सोनं
करावया ॥२॥

तुझ्या उदीमध्ये
थेंब अमृताचे
प्राण भाविकांचे
ताराव्या ॥३॥

तुझी उदी मला
कल्पतरू झाली
चिंता न उरली
जिवनाची ॥४॥

# भ्रम सरो

साईबाबा माझा
आईबाबा माझा
देव, गुरू माझा
साईबाबा ॥१॥

साईबाबा माझा
कन्या, पुत्र माझा
बंधू सखा माझा
साईबाबा ॥२॥

साईबाबा माझा
मी साईबाबांचा
ह्या दोन देहाचा
भ्रम सरो ॥३॥

—ग. दे. कुळकर्णी
अंबूरे वाडा मु. पो. ता. भूम जि. उस्मानाबाद

63

# तूच जगी आता

तूच जगी आता, एकमेव आधार
कसा साहू मी हा, आता भार ।।धृ.।।

आलो आता मी रे, तुझ्या दर्शनाला
घे रे आता मजला, साऊलीला ।।१।।

नको सोडू मज, देवा साईनाथा
अंतरीची भावना, हृदयाची व्यथा ।।२।।

निस्सीम भक्ती, अंतरी माझ्या
कळे तव चित्त, हृदयी तुझ्या ।।३।।

देरे राख्या स्थान, मना माझ्या ।।४।।
नमस्कार माझा सदा असो तुला
हृदयी माझ्या स्थान तुला ।।५।।

कवि – वि. शं. आकेरकर (साई-दास)
सांईनिवास मु. पो. पाट ता. कुडाळ

# शिरडीस जावे

मना लागे ओढ
शिरडीस जावे
चरण वंदावे – साईजींचे ।।१।।

तुझ्या मंदिरात
गावे गुणगान
होईल कल्याण – जीवनाचे ।।२।।

कितीही संकटे
आली मजवर
धावेल सत्वर – साईनाथ ।।३।।

साईनाथावरी
अढळ विश्वास
म्हणूनच ध्यास – जडलासे ।।४।।

—रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, गुजरलेन नवापूर जि. धुळे

## हेच माझे देवस्थान

माथा शोभे मुकुट छान ।
भाळी गंध कंठी पुष्पहार ॥
रोज सुगंधी उटणं ।
नित्य समाधीचे स्नान ॥
अंगी सुंदर कफनी ।
दिसे कसा छत्रधारी ॥
शिळेवरी ज्याचे ठाण ।
तेची माझे देवस्थान ॥
जीवन म्हणे श्रीसाईनाथ ।
तया माझा दंडवत ॥

**—विमल भाऊराव खडताळे**
टागोर नगर चाळ नं. १८५
खो. नं. २८३५
विक्रोळी मं. नं. ८३

## विसरलो उपाधी

गीत साईचे गाता । लागली समाधि
एकरूप भजनी होता । विसरलो उपाधी ॥धृ.॥
कळस सोनियाचा दिसता । जुळताती दोन्ही कर
मूर्ति तुझी पाहता । नयनी महापूर
महाद्वारी नंदी तुझ्या । न्याहळे समाधी ॥१॥
वाम गुडघ्यावरी ठेवी । सव्य चरण साई
भक्तीमध्ये भक्तांच्या । तो दंग सदा होई
तुझ्या जयजयकारे । शिर्डी निनादी ॥२॥
हाच सखा बंधु आमुचा । हाच मायबाप
हाच विष्णू । हाचि ब्रम्हा महेशही हाच
देह इथे त्यागावा ही आस एक साधी ॥३॥

**—सौ. सुशीलाबाई हजारे,**
मालेगाव कॅम्प, मालेगाव जि. नाशिक

५६

# साई भजन

साई भजन करिते, मी साई भजन करिते ॥धृ.॥

घरी दारी साई नामी–रंगुनी मी जाते ॥
शिरडी क्षेत्री अर्पूनी तनमन
विलीन होता झाले पावन
भजनी मी रमते – भजनी मी रमते ॥१॥

जातपात हृदयांतच नाहीं
हिंदू मुस्लीम भाई भाई
राम रहीम जपते – राम रहीम जपते ॥२॥

पुराण बायबल, कुराण वाचून
वाटत नाहीं प्रसाद सेवून
शिकवण मी स्मरतें – शिकवण मी स्मरतें ॥३॥

विमल पादुका शिरडी क्षेत्री
पावन झाली सारी नगरी
ध्यानीं मनीं भजतें – रंगूनी मी जाते ॥४॥

–रामचंद्र वा. वाके.


**मासिक भक्तिसंगम**

धर्म, तत्वज्ञान, संत-सत्पुरुष व देव-देवता यांचा मधुर संगम

संपादक – श्री. सुधाकर सामंत, वा. वर्गणी रु. दहा

योगभवन (जावळे बिल्डिंग) २ रा मजला, १८ ई भवानी शंकर पथ,

दादर मुं. २८

CLG

# साई तुझी आठवण येते

साई तुझी आठवण येते । साई तुझी आठवण येते ॥धृ.॥

आई होऊनी तव कन्येसी
स्वप्नी धरिले तूं पोटाशी ।
हुबेहुब तें क्षण आठवतें ।
साई तुझी आठवण येते ॥१॥

शारिरीक, मानसिक यातना ।
संसाराच्या विविध घटना ।
तुझ्या कृपेनें विरते ।
साई तुझी आठवण येते ॥२॥

तुझी बालके असंख्य जगती ।
माय माऊली तू एकच आमुची ।
साऊली तव पदराची वाटतें ।
साई तुझी आठवण येते ॥३॥

एक विसावा मम मानसी ।
सद्गुरू माझा हृदयवासी ।
शांता साई नाम घेते ।
साई तुझी आठवणे येते ॥४॥

—सौ. शांता अ. सरोदे.

## श्री रामजन्मोत्सवाचा सोहळा

शिरडी येथे श्रीराम जन्मोत्सवाचा प्रतिवार्षिक सोहळा एप्रिल ता. ८ ९, व १० या तीन दिवशी होणार आहे. सर्व भक्तांनी या उत्सवास हजर राहून सर्वतोपरीने सहकार्य द्यावे व उत्सवातील आनंद लुटावा अशी विनंती आहे. मुंबईत दादरच्या कार्यालयातही फक्त ९ एप्रिलला उत्सव होत आहे.

W67

# अक्कलकोट स्वामी महाराज पुण्यतिथी

– चैत्र व. १३ – ३०।४।१८७८

शके १८०० च्या चैत्र व. १३ या दिवशी प्रसिद्ध साक्षात्कारी सत्पुरुष व दत्तावतारी थोर विभूती स्वामी महाराज अक्कलकोट यांनी समाधी घेतली.

यांच्या जन्मस्थानाचा व इतर परिवाराचा नीट पत्ता लागत नाही. सन १८३८ च्या सुमारास हे मंगळवेढे येथे प्रकटले. यांचे अनेक शिष्य अनेक ठिकाणी दिसून येतात. त्यांच्या चरित्रात अनेक चमत्कारिक हकिगती दिसून येतात. योगमार्गातील यांचा अधिकार मोठा असून यानी गिरिनार पर्वतावर श्रीदेवीदास या योगाभ्यासकाच्या शंका दूर केल्या होत्या. आपण कर्दलीवनातून आलो असल्याचा उल्लेख यांनी एकदा भक्तगणांजवळ केला होता. श्रीनृसिंहसरस्वती हे गाणगापुरातून कर्दलीवनात गुप्त झाल्याची कथा असल्याने व हे यांचेच अवतार असल्याने या हकिगतीस महत्व येते.

यांच्या पूर्वजन्मांच्या हकीगतीही महान विचित्र व आश्चर्यकारक आहेत. अक्कलकोट येथे आल्यावर यांचे आचार वेड्याप्रमाणे होत असत. दिगंबरबाबा म्हणून यांची त्यावेळी प्रसिद्ध होती; पण लौकरच यांच्या अद्‌भुत सामर्थ्याची प्रचीती सर्वांना येत राहिली व साक्षात्कारी सत्पुरुष म्हणून यांचा लौकिक सतत वाढला. थोर थोर लोक दर्शनलाभ घेऊ लागले. सर्वजातीय, धर्मीय लोक यांच्या परिवारात असत. यांची राहणी चमत्कारिक पण विरक्तीपूर्ण असल्याने यांच्या बरवरच्या क्रियांचा अर्थ लावणे कित्येकवेळी अवघड होत असे. ते कधी कुणाशी नीट घडपणे बोलत नसत. राजवैभवासारखा शोभेल असा (राजयोगी) थाट यांना भक्त लोक उपलब्ध करून देत, पण हे कधी त्या विलासात गुरफटलेले दिसत नसत. 'आपण यजुर्वेदी ब्राम्हण, नाव नृसिंहमान, गोत्र काश्यप, मीन रास' अशी माहिती स्वत:संबंधी यानी एकदा दिली होती.

– सौ. सुभाषचंद्र 'साईनंद'

# ॥ श्री साई पाहिले शिरडी नगरी ॥

श्री साई पाहिले शिरडीनगरी । शतदीप उजळले माझ्या उरी
चरण क्षाळिते गोदामाई । छत्र मस्तकी शीतलता देई ॥धृ.॥
गोड आरती भक्तगण गाती । भुलली शिरडी नगरी
टाळ मृदुंगाचा गजर । साईनामाचा जयघोष करी ॥१॥
फकिर वेषे मूर्ति शोभली । अपार माया उरी भरली
धनी तेजाने द्वारकामाई । अखंड तेजाने राहिली ॥२॥
साईबाबांची शुभद पाउले । सेवाधा भक्तगण आले
घेऊन बाबांचे दर्शन । भक्तगण पावन जहाले ॥३॥

—कमल पांडुरंग गोरे
म्यु. एफ बिल्डिंग, ब्लॉक नं. ४ सायन, मुं. २२



माननीय श्री. वी. जे. खताळ महाराष्ट्र राज्याच्या नव्या मंत्रीमंडळात कायदेमंत्री झाल्याबद्दल श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीतर्फे त्यांना शाल व श्रीफळ देऊन प्रथम सत्कार करण्यात आला त्या प्रसंगीचे छायाचित्र. चित्रात सिटी सिव्हिल कोर्टाचे न्या. श्री. पारीखसाहेब ना. श्री. खताळ यांना शाल घालीत आहेत.

Regd. No. MH/BYE/26


# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १–५० | ८" × १०" | रु. ०–५० |
| १०" × १४" | रु. १–०० | २½" × ३½" | रु. ०–२० |
| ४½" × ५½" | रु. ०–३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. डी. डी. नेरॉय यांच्या ब्लॉकावरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी.) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिळेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १–५० |
| २. शिळेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | ,, ,, | १–२५ |
| ३. शिळेवर बसलेले बाबा | ,, | २२.८६ × ३३.०२ | ०–५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | ,, ,, | ०–५० |
| ५. शिरडी दर्शन ( ६६ फोटोंचा अल्बम ) | | | २–०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१ शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुं. नं. १४



मुद्रक : **पांडुरंग मोरे,** बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.

४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई–३१.

संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,

लोटादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.

# श्री साईलील




बाबा स्वहस्ते हंडीस भोजन तयार करीत व आपल्या हाताने
प्रसाद म्हणून ते वाटीत.

मे

६० पैसे

# अनुक्रमणिका — मे १९७६


| | | |
|---|---|---|
| १) | श्रीसाईलीलेचे पंचावन्नाव्या वर्षात पदार्पण | — संपादकीय. |
| २) | श्रीसद्गुरू गजानन महाराज पट्टेकर | — सदानंद चेंदवणकर |
| ३) | श्रीबाबांच्या फोटोची जन्मकथा | — डॉ. के. भ. गव्हाणकर. |
| ४) | युगावतार श्रीसाईबाबा | — श्री. चंद्रकांत सामंत |
| ५) | तुमचे श्रीबाबांच्या विषयीचे सामान्य-ज्ञान किती ? | — सदानंद चेंदवणकर |
| ६) | प्रत्यक्ष श्रीसाई दर्शन | — श्री. दशरथ रामजी तळेकर |
| ७) | बाबा काय करतात | — श्री. अनिल पंडित. |
| ८) | माणसाचं मन | — श्री. विनायक पाठक. |
| ९) | उदीमाईचा महिमा | — सौ. ललितागौरी कवली |
| १०) | मधुराजा — मधुराणी | — श्री. द. शं. टिपणीस |
| ११) | ३८९ नंबरचा तो हमाल | — श्री. सीताकांत कामत |
| १२) | श्रीसाईनाथ डिरेक्टरी | — — |
| १३) | श्रीसाईबाबा व अब्दुल करीम खां | — पं. बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी |
| १४) | महिमा महाराष्ट्राचा | — श्री. बाळकृष्ण वामणकर |
| १५) | वाचकांचा पत्रव्यवहार | — श्री. दा. ना. देशमुख |
| १६) | शिरडीवृत्त | — — — |
| १७) | आराधना | - कु. शोभना आळवे |
| १८) | उठी उठी साईनाथा | — सौ. कलावती चव्हाण |
| १९) | साईचे रूप | — श्री. दत्तात्रय महादेव मोरे |
| २०) | मनात मूर्ती तुझीच वसू दे | — श्री. सुदाम रा. उघडे |
| २१) | सर्वसाक्षी माझे बाबा | — श्री. शशिकांत तोंडवळकर |
| २२) | निर्माता तू ठावे | — लक्ष्मीतनया |
| २३) | स्मरा नित साईप्रभूचे नाव | — श्री. चकोर आजगांवकर |
| २४) | श्रीसाई वंदना | — श्री बृजकिशोर दुबे |
| २५) | श्रीसाईप्रेम | — श्री. महादेव दत्तात्रय भिडे |
| २६) | विडा | — सौ. साई आडकर |
| २७) | ओम् श्रीसाईनाथाय | — श्री. एन. आर. देशपांडे. |

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



# श्री साई वा क्सु धा

पुरुषांचे पौरुष ती ही सबूरी ।
पाप ताप दैन्यता निवारी ।
युक्ति प्रयुक्ति आपत्ति वारी ।
बाजूस सारी भयभीती ॥५४॥

सबूरी वरी यशाचा वाटा ।
विपत्ती पळवी बारा वाटा ।
येथ अविचाराचा काटा ।
नाहीं ठावुका कोणाही ॥५५॥

सबूरी सद्गुणांची खाणी ।
सद्विचार राघाची हे राणी ।
निष्ठा आणि ही सख्या बहिणी ।
जीव प्राण दोघींसी ॥५६॥

सबूरीवीण मनुष्य प्राणी ।
स्थिती तयाची दैन्यवाणी ।
पंडित असो का मोठा सद्गुणी ।
व्यर्थ जिणें हिजवण ॥५७॥

गुरु जरी महाप्रबळ ।
अपेक्षी शिष्य प्रज्ञाच केवळ ।
गुरुपदी निष्ठा सबळ ।
धैर्यबळ सबूरी ॥५८॥

—श्री साईसच्चरित अध्याय १९ वा.


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे
अधिकृत मासिक ]

वर्ष ५५ वे] मे ७६ [अंक १ व २

: संपादक :

श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ ३३ ६१

## संपादकीय—

स. न. वि. वि.

# श्रीसाईलीलेचे पंचावन्नाव्या वर्षात पदार्पण

गेल्या अंकापासून श्रीसाईलीलेने पंचावन्नाव्या वर्षात पदार्पण केले आहे. सुरुवातीपासून तो आजतागायत हे मासिक श्री साईबाबांच्या शिर्डी संस्थानचे एक अधिकृत मासिक म्हणून ओळखले जात आहे. आज हे मासिक महाराष्ट्रातच नव्हे, भारतातच नव्हे तर जगाच्या कोनाकोपऱ्यात श्री साईबाबांची भक्त मंडळी जिथे जिथे आहेत त्या त्या ठिकाणी जाऊन पोचलेले आहे. श्री साईलीलेचे आज असंख्य वाचक आहेत व भाविक मोठ्या भक्तीभावाने व तितक्याच बारकाईने या मासिकाच्या पानन् पानाचे वाचन करताना आढळून येतात. मराठीतील एक जुने मासिक म्हणून ते ओळखले जाते.

चैत्र शके १८४५ म्हणजे इ. सन १९२३ पासून हे मासिक सुरू झाले. फार मोठमोठी विद्वान व गाढ साईभक्त मंडळी या मासिकाचे संपादक पदावर आलेली आहेत. श्री लक्ष्मण गणेश महाजनी या थोर श्रीसाईभक्तांना या मासिकाचे पहिले संपादक पद भूषविण्याचा मान मिळाला. त्यावेळी या मासिकाचे प्रकाशक होते श्री आत्माराम रामचंद्र तर्खड. त्यावेळी या मासिकाची कचेरी ५ टर्नर रोड, बांद्रा ( बी. बी. रेल्वे ) मुंबई येथे होती. सध्याच्या सारखी महागाई त्यावेळी नव्हती, कागद स्वस्त होता व छपाई नि मजुरीचे दरही कमी होते, म्हणूनच की काय मासिकाची वार्षिक वर्गणी अवघी तीन रुपये होती. किरकोळ अंकास अवघे पाच आणे पडत.

पाच वर्षानंतर म्हणजे १९२८ सालापासून हे श्री साईलीला मासिक दोन महिन्यातून एकदा प्रसिद्ध होऊ लागले. वर्षाकाठी फक्त सहाच अंक प्रकाशित होत व वर्गणी होती तीनच रुपये.

सर्व साईभक्ताना माहितच असेल की श्री साईबाबांचे पहिले चरित्र हे मराठीमधूनच पण ओवीबद्ध स्वरूपात लिहिले गेले. श्री गोविंद रघुनाथ दाभोळकर उर्फ 'हेमाडपंत' यांनी ते लिहिले. स्वतः श्री साईबाबा गोविंदरावांना 'हेमाडपंत' या नावाने संबोधीत. बाबांच्या चरित्राचे कार्य बाबांच्या संमत्तीनेच व त्यांच्याच शुभाशिर्वादाने त्यांनी सुरु करून ते यशस्वीपणे पूर्ण केले. हे 'श्री साई सच्चरित्र' म्हणून ओळखले जाते. आज हे पोथीच्या स्वरूपात असून अनेक भाषांतून अनुवादीत झालेले आहे. परंतु सांगण्यासारखी गोष्ट अशी की हे सारे चरित्र श्रीसाईलीलेतून संपूर्णपणे क्रमशः प्रकाशित होत गेलेले आहे. 'श्री साईसच्चरित्र' हा ग्रंथ सारे साईभक्त एक परमपवित्र ग्रंथ म्हणून मानतात गुरु चरित्राचे असे आठवडाभर नियमबद्ध पारायण वाचन केले जाते तसेच वाचन याही ग्रंथाचे केले जाते. वाचन चालू असताना घरोघरी सप्ताह पाळले जातात व अखेरच्या दिवशी विधीपूर्वक सांगता समारंभही केला जातो.

१९२८ सालापासून म्हणजे शके १८५० पासून संपादक श्री. महाजनींच्या बरोबरीनेच श्री. रामचंद्र आत्माराम तर्खड यांचेही नाव संपादक म्हणून छापले जाऊ लागले परंतु १९२९ सालापासून मात्र फक्त श्री. तर्खड यांचेच नाव संपादक म्हणून छापले जाऊ लागले. हे तर्खड साहेब खटाव मखनजी मिलचे मॅनेजर होते. श्रीसाई सच्चरित्राच्या नवव्या अध्यायात बाबांचे एक निष्ठावंत भक्त म्हणून तर्खडांचा उल्लेख असून बाबा व ते यांच्या अनेक आठवणी व अनुभव त्यात आहेत.

१९३० सालानंतर शिर्डी संस्थानच्या आर्थिक व्यवहारात तूट आली म्हणून की काय संस्थान या मासिकावर जास्त खर्च करू शकले नाही; आणि म्हणूनच की काय या मासिकाचे प्रकाशन काही काळापुरते तरी बंद ठेवावे लागले. पुढे कुर्ल्याचे नामवंत साईभक्त डॉ. केशव भगवंत उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर शिर्डी संस्थानचे अध्यक्ष म्हणून निवडून आले तेव्हा त्यांनी प्रथम या बंद पडलेल्या मासिकाचे पुन्हा प्रकाशन कार्य १९४८ पासून सुरू केले. पण त्यावेळी हे मासिक त्रैमासिक म्हणून प्रसिद्ध होई. जानेवारी, एप्रिल, जुलै व ऑक्टोबर असे वर्षातून चार ठराविक साच्याचा मजकूर असलेले अंक प्रसिद्ध होत. मुखपृष्ठावर बाबांचा एकुण एकच ब्लॉक छापला जाई. त्यावेळी मासिकाची वार्षिक वर्गणी सव्वा दोन रुपये होती. किरकोळ अंक फक्त दहा आण्याला मिळे. पण मासिकाचा प्रचार चांगला होता. रेल्वेच्या स्टेशनवरील व्हिलर स्टॉल्सवरही श्री साई-लीलेचे अंक मिळत, वृत्तपत्र एजंटाकडे पण अंक थोडासा जाई. या वेळच्या अंकांमधून श्रीबाबांच्या बद्दलचे विविध अनुभव, अर्थातच भक्तांचे प्रसिद्ध केले जात. भक्तांचे काही अनुभव तर मनाला चटका लावणारे असत.

श्री. नागेश आत्माराम सावंत हे बाबांचे एक थोर भक्त होऊन गेले. त्यांना लेखनाची आवड होती म्हणूनच की काय डॉ. गव्हाणकरांनी त्यांना श्री साईलीलेच्या संपादकपदाची जबाबदारी संभाळण्याची संधि दिली, आणि श्री नागेशराव सावंतांचे नाव संपादक म्हणून १९५४ सालापासून श्री साईलीलेच्या पहिल्या पानावर दिसू लागले. या वेळेपर्यंत मासिकाने ३१ वर्षांची वाटचाल केली होती. श्री. सावंत साहेब यांच्याच जोडीला श्री. रामचंद्र महादेव राणे यांचेही नाव संयुक्त संपादक म्हणून छापले जाऊ लागले. १९५७ ते १९५८ हा वर्षभराचा काळ त्यांचे नाव छापले गेले. एप्रिल १९५९ पासून मात्र फक्त नागेशरावांचेच नाव संपादक म्हणून प्रसिद्ध होऊ लागले. १९५९ सालापासून अंकातील पानांची संख्या ४८ अशी मर्यादीत केली गेली, वार्षिक वर्गणी यावेळी फक्त पाच रुपये व किरकोळ अंकाची किंमत अवघी आठ आणे ठेवली गेली. १९५९ च्या एप्रिलपासून मात्र श्री साईलीला अखंडपणे दरमहा प्रसिद्ध होऊ लागली आहे ती अगदी या ताज्या अंकापर्यंत. अजिबात तिच्या प्रकाशनात खंड असा पडला नाही.

१९६० सालाच्या नंतर मात्र शिर्डी संस्थानच्या कारभारात खूप बदल झाला. जुन्या विश्वस्तांचा कारभार संपुष्टात आला व महाराष्ट्र सरकारच्या शासनातर्फे कोर्ट

रिसिव्हर यांची नेमणूक करण्यात आली व त्यांच्या अधिपत्याखाली व मार्गदर्शनाखाली श्री साईबाबा संस्थानचे कामकाज सुरू झाले. श्री. क्षीरसागर हे या दृष्टीने पहिले कोर्ट रिसिव्हर होत. श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प हे डिसेंबर १९६२ पासून संस्थानचा कारभार जातीने पाहू लागले, व ओघाने तेच श्री साईलीलेचे संपादक झाले. नव्हेंबर १९६४ पर्यंत त्यांनी कारभार पाहिला. १९६४ च्या डिसेंबरपासून श्री. बी. जी. पोतनीस कोर्ट रिसिव्हर म्हणून नेमले गेले ते जून १९६७ पर्यंत होते या काळात त्यांनी श्री साईलीलेचे संपादक म्हणून देखभाल केली. जुलै १९६७ ते नव्हेंबर १९७० पर्यंत श्री. डी. डी. पाटणकर यांची कोर्ट रिसिव्हर म्हणून सत्ता शिर्डी संस्थानवर होती. डिसेंबर १९७० पासून श्री. काशिनाथ सीताराम उर्फ भाऊसाहेब पाठक रिसिव्हर म्हणून साईबाबा संस्थानचा कारभार पहात आहेत. श्रद्धाळू व भाविक अंतःकरणाच्या श्री. पाठक साहेबांनी शिर्डी संस्थानचा अक्षरशः आज कायापालट केला आहे यामुळेच की काय भाविकांची रीघ येथे सारखी लागलेली असते.

एप्रिल १९५९ पासून श्री साईलीला ४८ पानांची निघू लागली. तिची वार्षिक वर्गणी पाच रुपये होती. या मासिकात फक्त मराठी मजकूरच प्रसिद्ध होत असे. पण ज्या भक्तांना मराठी समजत नसे त्यांच्यासाठी या मासिकाचा उपयोगच होत नसे, त्यांना आपले विचार मासिकातून प्रगट करता येत नसत आणि म्हणूनच की काय १९७१ पासून इंग्रजी विभाग या मराठी मासिकात सुरू करण्यात आला. यामुळे पानांची संख्या ४८ वरून ८० वर गेली. यामुळे मासिकाची वार्षिक वर्गणी दहा रुपये करण्यात आली व किरकोळ अंक एक रुपयास मिळे. परंतु ही व्यवस्था फार काळ टिकली नाही. ज्यांना मराठी अवगत होते त्यांना इंग्रजी विभागातल्या मजकुराचा काहीच उपयोग होत नसे व ज्यांना इंग्रजी येई त्यांना अंकातला मराठी विभागाचा मजकूर म्हणजे अकारण ओझे वाटे. अंकाच्या अशा या परिस्थितीची जाणीव श्रीसाईलीलेचे तत्कालीन कार्यकारी संपादक कै. प्रा. डी. डी. परचुरे यांना झाली आणि त्यांनी श्री. पाठकसाहेबांच्या बरोबर या संबंधात चर्चा केली. कोणत्याही चांगल्या गोष्टीला श्री. पाठक साहेबांचे अनुमोदनच असते इतकेच नव्हे तर संपूर्णपणे सहकार्य पण ते करतात. तेव्हा पाठक-परचुरे चर्चे-मधून मराठी व इंग्रजी अशी दोन संपूर्णपणे वेगळीच मासिके प्रकाशित करण्याचे ठरले आणि लगेच एप्रिल १९७३ पासून श्रीसाईलीला मराठी आवृत्ती व इंग्रजी आवृत्ती संस्थानतर्फे प्रकाशित होऊ लागली. आता मात्र दोन्ही मासिकांची पृष्ठसंख्या ४८ पाने अशी मर्यादित झाली व वार्षिक वर्गणी दहावरून सहा रुपये करण्यात आली. किरकोळ अंकाची किंमत ६० पैसे करण्यात आली. वाढती महागाई, कागदाची कमतरता, छपा-ईचे भरमसाट वाढलेले दर, पोस्टेज, प्रसादधन, संपादकीय खर्च इ. पायी आज संस्था-नला या दोन्ही मासिकांसाठी वीस हजार रुपये खर्च करावे लागत आहेत, परंतु असे जरी असले तरी हे मासिक अखंडपणे चालू ठेवण्याचा संस्थानच्या प्रशासकीय अधि-काऱ्यांचा निर्धार कायम आहे. फेब्रुवारी १९७६ मध्ये शिर्डीस भरलेल्या श्रीसाईलीला

द्वितीय लेखक-कवी स्नेहसंमेलनात मासिकाची वार्षिक वर्गणी आता वाढवावी असे विचार अनेकांनी प्रगट केले होते, परंतु तूर्त तरी वाढ करण्याचा आमचा विचार नाही. आजश्रीसाईलीला श्री साईबाबांच्या तत्वज्ञानाचा, त्यांच्या आदर्श विचारसरणीचा, त्यांच्या अजब लीलांचा, त्यांच्या अचाट योगसामर्थ्याचा, त्यांच्या सत्कृत्यांचा प्रचार-प्रसार करीत आहे. भाविकांना, भक्तांना आलेले विविध अनुभव दर अंकातून प्रकाशित होत आहेत. बाबांबद्दलच्या अनेक भावमधुर कविताही अंकामधून प्रसिद्ध होत आहेत आणि असे हे श्री साईबाबांच्याबरचे हे सुंदर आध्यात्मिक आणि एकमेव अधिकृत असे मासिक नियमितपणे दरमहा प्रसिद्ध होत आहे. वाचकांनी असाच आमचेवर लोभ ठेवावा व श्रीबाबांनी आम्हास हे मासिक आणखीन सुंदर करण्याच्या कामी सामर्थ्य व बुद्धी द्यावी अशी त्या श्री दयाघनाजवळ प्रार्थना करतो.

●

---

## श्रीसाईलीला मे १९७६ अंकात अवश्य वाचा

- गाठीभेटी या सदरात पुण्याचे साईभक्त श्री काटेमहाराज — श्री. सूर्यकांत गर्जे
- अजानबाहू श्रीसाई — डॉ. अनिल जायस्वाल
- माझे श्रद्धास्थान — डॉ. के. भ. गव्हाणकर
- ब्रम्हीभूत सच्चिदानंद स्वामी महाराज — श्री. ग. वि. कविटकर एम्. ए.
- त्रैमूर्ति श्री साई — श्री. गणपत गोविंद सामंत एम. ए.
- युगावतारी श्री साईबाबा — श्री. चंद्रकांत सामंत, बी. ए. बी. कॉम.
- तुमचे श्री साईबाबांविषयीचे सामान्य ज्ञान किती आहे —
- याशिवाय श्री बाबांच्या विषयीच्या अनेक भावमधुर कविता —

गाठीभेठी : १८

श्री साईभक्त सद्गुरु–

# श्री गजानन महाराज पट्टेकर

● सदानंद चेंदवणकर
'राधामाधव', १२०/४०५५ टिळकनगर, चेंबूर ८९

चांद्रवंशीय कायस्थ प्रभू समाज हा मुंबानगरीमधील एक प्राचीन व प्रसिद्ध असा समाज आहे. श्रीराममारुती सारखे अनेक साक्षात्कारी संत या समाजात होऊन गेले. वणीच्या देवीचे उपासक आणि भगवान श्रीसाईबाबांचे परमभक्त श्री गजानन महाराज उर्फ अण्णासाहेब पट्टेकर हे याच समाजातील आजचे थोर संत आहेत. सध्या त्यांचे वास्तव्य ठाणे येथे आहे.

पट्टेकर महाराजांचे मूळ घराणे गुप्ते. हे घराणे शिवकालापासून प्रसिद्ध. त्या काळात या घराण्याकडे नाशिक, नगर, ठाणे या सरहद्दीवरील पट्टा व आसपासचे किल्ले यांचे आधिपत्य होते आणि यामुळेच की काय त्यांचे गुप्ते हे आडनाव मागे पडून पट्ट्याचे अधिपती म्हणून पट्टेकर हे आडनाव प्रचलित झाले व आज तेच रूढ आहे.

महाराजांचे वडील कै. केशवराव बाळकृष्ण पट्टेकर हे मामलेदार म्हणून परिचयाचे होते. प्रांताचे शिरस्तेदार, अव्वल कारकून, महालकरी, पहिला वर्ग न्यायाधिश अशा हुद्यांवरून कामे करून १९३७ ला ते भिवंडीला सेवानिवृत्त झाले. आपल्या नोकरीच्या काळात त्यांनी अनेकाना पोटापाण्याला लावले, गोरगरिबांना आश्रय दिला. कर्तव्यनिष्ठा, धार्मिक आचरण व उदार मनोवृत्ती यामुळे त्यांचा सर्वत्र बोलबाला होता. सोळा सोमवारच्या व्रत प्रसादाने त्यांचा जन्म झाला होता. १९४२ च्या पहिल्या श्रावण सोमवारीच ते अनंतात विलीन झाले.

महाराजांच्या मातोश्री महाधर्मनिष्ठ व पतिसेवापरायण होत्या. त्यांनी सतत पाच वर्षे सोळा सोमवारचे व्रत केले. उद्यापनाचे रात्री श्रीगणपतीने त्यांना स्वप्नात दृष्टांत देऊन सांगितले की आपण तुझ्या पोटी येत आहोत. त्यावेळी त्या शहापूर येथे होत्या. १९११ च्या ऐन दिवाळीत धनत्रयोदशीच्या दिवशी म्हणजे ३० ऑक्टोबर १९११ रोजी त्यांचा जन्म झाला व श्रीगणपतीचा प्रसाद म्हणून त्यांचे नाव गजानन असे ठेवण्यात आले.



साईभक्त श्री गजानन महाराज पट्टेकर

गजाननरावांचे प्राथमिक शिक्षण शहापुरात व दुय्यम शिक्षण ठाण्याला मो. ह. हायस्कूलात झाले. जरा का कुठे त्यांना फुरसतीचा वेळ मिळाला की ते गावाबाहेर असलेल्या मारुतीच्या देवळात जाऊन बसत. मुखाने हनुमानाचा जप करीत, उंच उंच झाडावर चढून अगदी शेंड्यावर जाऊन बसत. लहानपणीच त्यांनी अविवाहित राहाण्याचा ठाम निश्चय केला व तो आपल्या आप्त नातलगांना बोलून दाखविला. त्यामुळे तरुणपणी त्यांच्या लग्नाच्या भानगडीत कुणी पडले नाही. गजाननरावांना त्यांचे आवडते दैवत हनुमान. मारुतीने हुकूम केला व त्यामुळेच की काय त्यांनी प्रसिद्ध समाधिस्थ संत श्री दादामहाराज पाटगावकर यांना गुरु केले.

आपले शिक्षण संपल्यावर महाराज लष्करात सिव्हिलियन सिक्युरिटी ऑफिसर या पदावर नोकरीस राहिले. आपल्या अंगच्या गुणामुळे व हुशारीमुळे त्यांनी महत्त्वाच्या कामगिऱ्या केल्या व त्याबद्दल त्यांचा वेळोवेळी सत्कारही झाला. जन. राजेंद्रसिंहजी, मे. ज. कर्नल हरदयाळ, कर्नल सबनीस इ० अधिकाऱ्यांनी त्यांची मुक्तकंठाने प्रशंसा केलेली आहे. १९३५ साली महाराजांनी सुविख्यात क्रिकेटपटू पी. बाळू व श्री. बाळासाहेब खेर यांचेबरोबर हरिजनोद्धाराचे कार्य केले. १९३७ साली त्यांनी राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांची भिवंडीस भेट घेऊन त्यांना हरिजनांच्या अडीअडचणी समजावून दिल्या. महाराजांच्या अशा या कार्याबद्दल त्यांचा गौरव मुलुंड व कामाठीपुरा येथे सत्कार करून करण्यात आला होता. संतशिरोमणी गाडगेबाबांनीही महाराजांचा गौरव केलेला आहे.

श्री गजानन महाराज अधिक श्रावण मासानिमित्त गाणगापूरला स्नानासाठी गेले असता तिथे त्यांना श्रीदत्तगुरुचा आदेश मिळाला व त्यानुसार ते ४–८–१९६६ रोजी अक्कलकोटला गेले. गजानन स्वामींच्या हातात मंदार फुले व मंदारची रोपटी पाहून तेथील पुजारी श्री. पांडुरंग पुजारी यांनी महाराजांना सांगितले की अक्कलकोटस्वामी ज्या वाड्यात उतरले होते तेथील मंदारचा वृक्ष वठत चाललेला आहे. त्याला पाने, फुले, फळे येत नाहीत याचे कारण काय? गजानन महाराजांनी त्या वठलेल्या वृक्षाकडे पाहिले व म्हटले, अहो यांच्या बुडाशी श्रीगणपती आहे. आज श्रीस्वामी समर्थांचा गुरु व अधिक मासातील संकष्टी चतुर्थी आहे व अशा पर्वणीवर मी श्रींना प्रगट करण्यासाठीच आलो आहे. हे ऐकताच पुजारी चकितच झाला. पुढे या मंदार वृक्षाच्या मुळाशी खणताच तीन फूट खोलीवर असलेली उर्ध्वशुंड गणरायाची मूर्ती खरोखरीच सापडली व ती नंतर मोरे गावचे वे. मू. दत्तात्रय गोविंद ढेरे यांचे हस्ते सिंदूर लेपन होऊन १९६६ च्या गणेश चतुर्थीस या धुंडीराज वरद मंदार गणेशाची यथा शास्त्र प्राणप्रतिष्ठा महाराजांचे हस्ते करण्यात आली. श्री देवी वज्रेश्वरी मूर्तींची पण स्थापना महाराजांनी कुडसजवळील गंजकाठी केली आहे. हे वज्रेश्वरीचे मूळ स्थान होय व तेथील जुन्या मूर्ती भंगल्या होत्या. एका जुन्या भक्ताने श्री वज्रेश्वरी व श्री रेणुका यांच्या मूर्ती तयार करून दिल्या. श्रीगजानन महाराजांनी १९ फेब्रुवारी

१९६८ रोजी नाशिक जिल्ह्यातील नांदुरी जवळच्या श्री सप्तशृंग निवासिनीच्या गडावरील कै. दाजीबा आराध्ये महाराजांच्या १२० वर्षांपूर्वीच्या समाधीचा जीर्णोद्धार केला. हे आराध्ये महाराज देवीचे निस्सीम उपासक होते. ही समाधि नवसाला पावते अशी भाविकांची श्रद्धा आहे. महाराज नाशिकला गेले की समर्थांच्या टाकळी जवळील गोदा-नंदिनी संगमावर स्नान करतात. समर्थस्थापित रामरायाचे दर्शन घेण्याचा त्यांचा आज कैक वर्षांचा प्रघात आहे. कुलाबा जिल्ह्यातील माणगावजवळील कडापे गावी पाण्याची फार मोठी टंचाई होती. लोकांना दोन मैलावरून पाणी आणावे लागे. गावात पाणी कोठे मिळेल हे शोधण्याचे प्रयत्न झाले पण ते सारे विफल झाले. तेव्हा गजानन महाराजांना गावात मुद्दाम निमंत्रण देऊन पाणी कोठे लागेल ते सांगा अशी प्रार्थना गावकऱ्यांनी केली. तेव्हा महाराजांनी पाणी मिळण्याच्या तीन जागा दाखविल्या. त्यापैकी एका जागी खोदण्यात आले आणि काय, तिथे खरोखरीच पाणी लागले! कडापे गावकऱ्यांवर त्यांनी अशाप्रकारे कायमचे उपकार करून ठेवलेले आहेत. कल्याणजवळच्या दुर्गाडी किल्ल्यावरील श्रीदुर्गामातेच्या मूर्तीची स्थापना त्यांच्याच शुभहस्ते झालेली आहे. श्रीगजानन महाराज पट्टीचे पोहणारे आहेत. ते घोड्यावर सफाईदारपणे बसतात व तेवढ्याच सफाईने क्रिकेटपण खेळतात. ठाण्यातील क्रिकेटपटू श्री. खंडू रांगणेकर, हेमू अधिकारी, पी. विठ्ठल यांच्याशी त्यांचा स्नेह आहे.

श्री गजानन महाराज हे आजच्या युगातील एक थोर संत आहेत. आजही ते दीपस्तंभाप्रमाणे जनतेस मार्गदर्शन करीत आहेत. त्यांच्या कृपा प्रसादाने अनेकांची संकटे दूर झाली आहेत. अनेकांना मार्गदर्शन लाभलेले आहे. शेकडो अडीअडचणीत सापडलेल्यांची जीवने पुन्हा फुलली आहेत तीर्थयात्रेच्या निमित्ताने श्री गजानन महाराज देव देवस्थानांचा दौरा करतात. प्रसंगी जीर्णोद्धार करून भाविकांना मार्गदर्शन करतात. ज्याची इष्ट देवता असेल त्या स्वरूपात महाराज त्याला दिसतात.

श्री गजानन महाराज उर्फ अण्णासाहेब पट्टेकर यांचा वेष व राहाणी अत्यंत साधी आहे. त्यांना सुपारीच्या खांडाचेही व्यसन नाही. कुणापासून ते कधीच कसलीच अपेक्षा करीत नाहीत. त्यांना स्वतःचा संसार नाही. कोणताच मोहपाश नाही. आपल्या भक्तगणांचा संसार हाच आपला संसार असे ते मानतात ते वणीच्या देवीचे परम उपासक आहेत. भगवान श्री साईबाबांचे निस्सीम भक्त आहेत. ते अलीकडच्या काळात शिर्डीस गेले होते तेव्हा कोर्ट रिसिव्हर श्री. का. सी. पाठक यांनी त्यांचा शाल व श्रीफल अर्पण करून सत्कार केला होता. ज्योतिषी, ज्योतिष सांगून कुणाला काही देऊ शकत नाही. भगवंताचे, देवीचे, साईबाबांचे नामस्मरण करा, नामस्मरणाने ग्रह बदलतात, इष्टप्राप्ती होते. नाम हेच भगवंताचे सत्यस्वरूप होय असे त्यांचे स्पष्ट मत आहे. आपल्याकडे दर्शनाकरिता येणाऱ्यास महाराज प्रथम वणीच्या श्रीसप्तशृंगीचे लाल कुंकू लावतात व त्यास गाणगापूरच्या भस्माचा प्रसाद देतात. महाराज कित्येकदा आपल्याला नमस्कार करणाऱ्याच्या पाठीवर थाप मारतात व त्या थापेच्या फटकाऱ्यातच त्याच्या दुःखाचे बरेचसे ओझे हलके होते.

## हं ! हा फोटो बाबांचा—



# —आणि त्या फोटोची जन्मकथा अशी :

● डॉ. के. ग. गव्हाणकर
इंदिरा निवास, आग्रा रोड, कुर्ला, मुं. ७०

( सत्यनारायण कंपनी सोलापूर, कंपनीची स्थापना शके १८३३ मित्ती चैत्र शु॥१. मॅनेजर वासुदेव सदाशिव जोशी )

भक्तिपरायण रा. रा. गोविंद धोंडो पानसरे यांनी सिद्ध पुरुष श्री " साईनाथ उर्फ साईबाबा " यांचे दर्शनाचा योग कसा आला व त्यांचेबद्दल अनुभवसिद्ध मत काय आहे, असा प्रश्न केल्यावरून सदर्हू सिद्ध पुरुषाची, पूर्ववृत्ती स्मरण करण्याचा अलभ्य योग त्यांनी आणल्यामुळे त्यांचे आभार मानून श्रीनारायणकृपेने व श्रीसद्गुरूंच्या प्रसादाने घडलेली हकीगत सादर करतो. तिचा सानंद स्वीकार करून तीत योग्य ती दुरुस्ती करून आपल्या श्री साईलीलेत तिला जागा द्याल अशी आशा करतो.

या देहाची थोडक्यात ओळख करावयाची म्हणजे या जिवास पूर्ण कर्मानुसार वयाचे सोळावे वर्षापासून " यद्दृष्टं तन्नष्टम् " या वाक्याची जागृती होऊन केवळ देह-प्राक्तन भोगण्याकरिताच गृहस्थाश्रमात दाखल व्हावे अशा भावनेत आज वयाचा सुमारे सदतीस वर्षाचा काळ गेला. या गेलेल्या काळात अनेक साधूसंत व सत्पुरुषांच्या गाठी पडल्या, परंतु भूतलावर असलेल्या बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध; अशा चार प्रकारात सिद्धावस्थेत पोचलेल्या पुरुषामध्ये सिद्ध पुरुष श्री " साईबाबा " हेच प्रथम गाठ पडलेले असे मोठ्या आनंदाने म्हणत आहे. असो.

भेटीचा योग :– मुमुक्षावस्थेत पडलेले पेन्शनर मामलेदार घोडनदी येथील श्री. रा. रा. चिदंबर केशव उर्फ अण्णासाहेब गाडगीळ यांनी श्री क्षेत्र गाणगापूर येथे अन्नछत्र घातल्यामुळे सोलापूर पेठेशी संबंध पडून व्यवहारदृष्ट्या त्यांची गाठ पडली. नंतर समसमान संयोग झाल्यावर परमानंद प्राप्त होतो त्याप्रमाणे होऊन सदर गृहस्थानी शके १८३५ साली आज्ञा केली की " मी शिरडी मुक्कामी आहे, येथे नामसप्ताह सुरू आहे तरी दर्शनाकरिता यावे. येण्याजाण्यास रुपये दहा खर्च लागेल, चिंता नाही. श्रीनारायण आपणास कोठेही देईल; परंतु ही वेळ वाया जाऊ देऊ नये " याप्रमाणे विनंतिपत्र वाचून जो आनंद झाला तो लिहिणे शक्य नाही. नंतर व्यवहार पद्धतीप्रमाणे सहचारी जिवांची परवानगी घेऊन जरी द्रव्याची अडचण होती, तरी पण हा देह जाण्यास तयार होऊन सदर सिद्धांचे कृपेनेच शिर्डी येथे रा. रा. गाडगीळ हे त्यांचे परम स्नेही रावबहादूर तात्यासाहेब साठे यांचे वाड्यात होते तेथे दाखल झाला. नंतर स्नानसंध्यादि कर्मविधि सारून सदर गाडगीळ यांचेबरोबर श्रीचे दर्शनास पूजा सामानासह तयार झाला. बाबा मसजीद मध्ये होते. तेथे पूजा वगैरे आटोपून सर्व थाट पाहून देहाची